महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे | Rs.2/-

रविवार ❖ २९ सप्टेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक ०९६ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.

:: कार्यालय ::

९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१

E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com

news.thanejeevandeep@gmail.com

# 'आमचा महाराष्ट्र, आमचं मतदान'

## राज्यातील निवडणुका दिवाळी नंतरच | केंद्रीय निवडणूक आयोगाचे संकेत

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी घेतलेल्या पत्रकार परिषदेत मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले, 'आम्ही महाराष्ट्र दौऱ्यात ११ पक्षांसोबत चर्चा केली आहे. आम्ही आमचा महाराष्ट्र, आमचं मतदान, अशी टॅगलाइन घेण्यात आली आहे.**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/(वृत्तसेवा) -**

### निवडणूक आयोगाने घेतला महाराष्ट्र निवडणुकीचा आढावा




मुंबई : केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार हे दोन दिवसीय महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला.

या आढाव्यासाठी आयुक्तांनी सर्व सरकारी संस्था आणि राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. आयुक्त राजीव कुमार यांनी ११ राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. त्यानंतर आज शनिवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी अनेक महत्वाचे मुद्दे अधोरेखित केले. यावेळी त्यांनी राज्य निवडणूक आयोगाला महत्वाच्या सूचना केल्या.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी घेतलेल्या पत्रकार परिषदेत मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले, 'आम्ही महाराष्ट्र दौऱ्यात ११ पक्षांसोबत चर्चा केली आहे. आम्ही आमचा महाराष्ट्र, आमचं मतदान, अशी टॅगलाइन घेण्यात आली आहे. दिवाळी, देव दिवाळी यासारखे सण-उत्सव आहेत. त्या गोष्टी पाहूनच निवडणुकीची घोषणा करावी. निवडणुकांच्या तारखांची घोषणा करताना लागोपाठ सुट्ट्या येणार नाहीत, याची काळजी घ्यावी.

**विधानसभा निवडणूक माहिती**

महाराष्ट्रात विधानसभेचे एकूण मतदारसंघ : २८८ ;
SC २९ आणि ST २५ मतदारसंघ.
***चालू विधानसभेचा कार्यकाळ २६ नोव्हेंबर रोजी संपणार आहे. त्याआधी विधानसभा निवडणूक घ्यावी लागणार.***
महाराष्ट्रात एकूण नोंदणीकृत मतदारांची संख्या ९.५९ कोटी.
पुरुष मतदारांची संख्या ४.५९ कोटी आणि महिला मतदारांची संख्या ४.६४ कोटी.
तृतीयपंथीय मतदारांची संख्या ६०००.
वय वर्ष ८५ च्या पुढे असलेल्या मतदारांची संख्या १२.४८ लाख.
पहिल्यांदाच मतदान करणारे १९.४८ लाख मतदार.
१ लाख १८६ पोलिंग स्टेशन : ९ लाख नवीन महिला मतदार.
शहरी विभागात १०० % बुथवर सीसीटीव्ही लावण्यात येणार
ग्रामीण भागात ५० % बुथवर सीसीटीव्ही लावण्यात येणार.

पान ४ वर ▸▸

# 'लाडक्या बहिणीं'ना देण्यात येणारा पैसा जनतेचा'

## - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/(वृत्तसेवा) -**

मुंबई : लाडकी बहीण योजना म्हणजे महिलांना दिलेली लाच आहे, असे विरोधक म्हणतात. लाडक्या बहिणींना देण्यात येणारा पैसा हा इतर कुणाचा नसून जनतेचा आहे. तोच पैसा सरकार लाडक्या बहिणींना देत आहे, असे स्पष्टीकरण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देत लाडक्या बहिणींना लाचखोर म्हणण्याचा अधिकार विरोधकांना कुणी दिला, असा टोलाही त्यांनी विरोधकांना लगावला. शिर्डी येथे शुक्रवारी आयोजित करण्यात आलेल्या मुख्यमंत्री

पान ४ वर ▸▸

# 'माझी वसुंधरा' अभियानात ठाणे जिल्हा सर्वोत्तम



कल्याण : १ एप्रिल २०२३ ते ३१ मे २०२४ या कालावधीत राज्यात माझी वसुंधरा हे अभियान राबविण्यात आले. या अभियानात पृथ्वी, जल, अग्नी, वायू आणि आकाश या पाच तत्वाचे जतन संवर्धन व विकास करणे या विषयी जनजागृती करण्याच्या स्पर्धेत कोकण विभागातून १४०८ ग्रामपंचायतीमधून ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील' फांगुळगव्हाण, ग्रामपंचायतीला तिसरा क्रमांक मिळाला आहे, तर ठाणे जिल्हाचा सर्वोत्तम कामगिरी करणारा जिल्हा म्हणून कोकण विभागातून गौरव केला आहे. त्यामुळे या ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य, ग्रामसेवक, विस्तार अधिकारी, बीडिओ, डेप्युटी सीईओ, सीईओ यांचे अभिनंदन होत आहे.

माझी वसुंधरा अभियान हा महाराष्ट्रातील स्थानिक संस्थामधील पर्यावरणाच्या संवर्धनासाठी निसर्गाच्या पंचतत्वावर (पंचमहाभूतांवर)आधारित माझी वसुंधरा या उपक्रमांतर्गत राबविण्यात येणारा पहिला कृतीशील उपक्रम आहे, २ ऑक्टोंबर २०२०रोजी मंत्री, पर्यटन, पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग यांच्या तर्फे हे अभियान सुरू करण्यात आले होते. १ एप्रिल २०२३ ते ३१ मे २०२४ या कालावधीत संपूर्ण राज्यात हे राबविण्यात आले. या अभियानात पृथ्वी, जल, अग्नी, वायू आणि आकाश या पंचतत्वाचे जतन, संवर्धन व विकास करणे या विषयी जनजागृती करण्याच्या स्पर्धेत कोकण विभागातून सुमारे १४०८ ग्रामपंचायतीनी भाग घेतला होता. या स्पर्धेचा निकाल काल म्हणजे शुक्रवारी जाहीर झाला. यामध्ये संपूर्ण कोकण विभागातून ठाणे जिल्ह्यातील मुरबाड पंचायत समितीच्या अंतर्गत असलेल्या फांगुळगव्हाण या ग्रामपंचायतीचा तिसरा क्रमांक आला आहे तर कोकण विभागात सर्वोत्तम कामगिरी करणारा म्हणून ठाणे जिल्ह्याचा

पान ४ वर ▸▸

# अमित शहांनी घेतला विधानसभा निवडणूक आढावा



काही महिन्यांपूर्वी लोकसभा निवडणूका पार पडल्या. यावेळी भाजपला अपेक्षित असे यश मिळाले नाही. महाराष्ट्रामध्ये महायुतीला मोठा फटका बसला. या निकालाच्या पार्श्वभूमीवर महायुतीने विधानसभेसाठी मोठा प्लॅन तयार केला आहे.

या निकालाची पुनरावृत्ती विधानसभेत होता कामा नये यासाठी भाजप हायकमांड आता सतर्क झाल आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आपला मोर्चा महाराष्ट्राकडे वळवला आहे. सध्या अमित शहा महाराष्ट्राच्या राज्याच्या दौऱ्यावर असून ठिकठिकाणी सभा घेत भाजप कार्यकर्त्यांचं मनोबल वाढवत आहे. अशातच अमित शहा यांनी आगामी विधानसभेला महाराष्ट्रात गुजरात पॅटर्न लागू करण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. त्यांच्या या संकेतामुळे भाजप आमदारांना धडकी भरली असून अनेकांची झोप उडाली आहे. अमित शहा यांनी नुकत्याच पार पडलेल्या नागपूर येथील बैठकीत गुजरात पॅटर्नचा किस्सा देखील सांगितला आहे.

**काय म्हणाले अमित शहा?**

'जेव्हा मी ३५ वर्षांचा होतो, तेव्हा विधानसभा निवडणुकीत पक्षाने माझे तिकीट कापले होते. त्यावेळी भाजपचे अध्यक्ष कुशालभाऊ ठाकरे माझ्याकडे आले होते. तेव्हा मी खूप दुःखी आहे असं त्यांना सांगितलं. तेव्हा तू अजिबात पक्षाचा प्रचार करू नकोस. दुःखी मनाने कोणताही माणूस चांगले काम करू शकत नाही', असं ठाकरेंनी आपल्याला सांगितल्याचं शहा म्हणाले. एखादा नेता जर पक्षाने तिकीट कापल्यावर नाराज असेल तर त्याची घरी जाऊन समजूत काढावी लागते, तो कार्यकर्ता नाहीच असं कुशालभाऊ ठाकरे मला सांगून गेले आहेत, असा किस्सा अमित शहा यांनी सांगितला. दरम्यान, अमित शहा यांच्या या उदाहरणामुळे विधानसभेत महाराष्ट्रात देखील

पान ४ वर ▸▸

# ठाणे स्टेशनवर ८ मजली कमर्शिअल टॉवर उभारण्यात येणार




रेल्वे जमीन विकास प्राधिकरणाने (RLDA) ठाणे रेल्वे स्थानकावर व्यावसायिक टॉवर विकसित करण्यासाठी निविदा मागवल्या आहेत. नियोजित जागा ठाणे स्थानकाच्या पूर्वेला, स्टेशन एरिया ट्रॅफिक इम्प्रूव्हमेंट स्कीम (SATIS) डेकच्या वर आहे.

आगामी ८ मजली इमारतीत विविध व्यावसायिक जागा असतील. यामध्ये फूड कोर्ट, कमोडिटी विक्रेते, प्लॅटिनम-रेट केलेले ग्रीन ऑफिस स्पेस आणि टेरेस गार्डन असेल. इलेक्ट्रिक वाहनांसाठी भूमिगत सेन्सर-आधारित पार्किंग आणि चार्जिंग स्टेशन देखील उपलब्ध असतील. कॉम्प्लेक्समध्ये आउटडोअर कॅफे देखील समाविष्ट केला जाईल.

RLDA ची अपेक्षा आहे की, टॉवरमध्ये ओपन एअर डायनिंग स्पेस, एस्केलेटर, लिफ्ट

पान ४ वर ▸▸

# राजकीय उद्घाटनाची वाट पाहतोय नवीन पुल



वांगणीतील जुन्या पुलाला भगदाड
तरीही तयार असलेला नवापूल वाहतुकीसाठी बंद ठेवला

ठाणे : ठाणे आणि रायगड जिल्ह्याच्या सरहद्दीवर उल्हास नदीवर पाषाणे वांगणी येथे वाहतूकीसाठी एक पूल बांधण्यात आला होता. या पुलाला आता भगदाड पडलेलं असून पुलाची अवस्था अत्यंत नाजूक झाली आहे. मात्र तरी देखील या पुलावरून वाहनांची वाहतूक सुरु आहे. पुलाची दुरावस्था पाहता वाहतूकीसाठी नवीन पुल बांधण्यात आला आहे. मात्र अद्याप या पुलाचे उद्घाटन झालं नसून पुल वाहतूकीसाठी बंद ठेवण्यात आला होता. त्यामुळे नागरिकांना स्वतःचा जीव धोक्यात घालून जुन्या पुलावरून वाहतूक करावी लागत होती. ठाणे आणि रायगड जिल्ह्याच्या सरहद्दीवर उल्हास नदीवर पाषाणे वांगणी येथे पुल आहे. त्या पुलाची स्थिती नाजूक असून पुलाला भगदाड पडलेला असताना देखील जुन्या पुलावरून वाहतूक सुरू होती. दरम्यान, त्या ठिकाणी नवीन पुल बांधण्यात आला असून हा नवीन पुल राजकारणी लोकांनी उद्घाटन करण्यासाठी बंद करून ठेवला होता. त्यामुळे धोकादायक स्थितीतील पुलावरून धोका पत्करून नागरिकांना वाहतूक करावी लागत होती. ठाणे आणि रायगड दोन जिल्ह्याला जोडणाऱ्या वांगणी पाषाणे या उल्हास नदीवर पूल आहे. तेथे नवीन पुलाच्या

पान ४ वर ▸▸




# क.डों.म.पा वर्धापन दिनानिमित्त महापालिकेची सांस्कृतिक मेजवानी




कल्याण : १ ऑक्टोबर २०२४ रोजी महानगरपालिकेचा ४१ वा वर्धापन दिन आहे. त्याचप्रमाणे या दिवशी ज्येष्ठ नागरीक दिनही साजरा केला जातो. या दोन्ही गोष्टींचे औचित्य साधून महानगरपालिकेने दि. १ ते ५ ऑक्टोबर दरम्यान भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

यामध्ये १ ऑक्टोबर रोजी 'स्वच्छता ही सेवा' या उपक्रमाअंतर्गत प्र.के. आचार्य अत्रे रंगमंदिरात सकाळी १०.३० वाजता महा पालिकेच्या सफाई कर्मचा-यांसाठी मनोरंजनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमात सफाई कर्मचा-यांमार्फत देखील सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमामध्ये सफाई कर्मचा-यांकरीता आर्थिक साक्षरतेचे सत्र आयोजित करण्यात आले असून, यामध्ये सदर कर्मचा-यांना तज्ञ व्यक्तीमार्फत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

महापालिका क्षेत्रात स्वच्छतेविषयक जागरुकता वाढविणे, वातावरणीय बदल व पर्यावरणीय समस्यांबाबत नागरीकांमध्ये जनजागृती करण्याच्या अनुषंगाने महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत आयोजिलेल्या 'कचरामुक्त तारांकित सोसायटी' स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा २ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजता प्र.के.आचार्य अत्रे रंगमंदिर येथे संपन्न होणार आहे. यावेळी महापालिकेमार्फत घेण्यात आलेल्या 'स्वच्छ आणि पर्यावरणपुरक शासकिय कार्यालय' या स्पर्धे अंतर्गत ३ महापालिका प्रभाग व ५ शासकिय कार्यालये यांना देखील पारितोषिके देवून सन्मानित करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे

पान ४ वर ▸▸



### आर एल पी शाळेत विद्यार्थ्यांसाठी नीमले ग्रुप तर्फे

# आरोग्य व स्वच्छतेचं मार्गदर्शन




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/(प्रतिनिधी) –**

ठाणे-शहरात वाढनारे आजार आणि अस्वच्छता काही प्रमाणात कमी करण्यासाठी कै.राम लखन पांडे मेमोरियल एज्युकेशन ट्रस्ट संचलित.आर.एल.पी.हायस्कूल मध्ये निमळे कंपनीतर्फे मुलांना स्वच्छतेची माहिती देण्यात आली. प्रोजेक्टरच्या माध्यमातून मुलांना स्वच्छतेच्या बाबतीत वेगवेगळे मार्गदर्शन करत निरोगी व सदृढ कसे राहावे यांचे समुपदेशन करण्यात आले तसेच मुलांना आरोग्य बाबतीत अनेक प्रश्न विचारत मुलांनी देखील मनसोक्त प्रश्नांची विस्तृत उत्तरे दिली यावेळी सर्व मुलांना प्रमाणपत्रे देखील देण्यात आली व ती मिळताच मुलांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला शेवटी समारोप वेळी प्रत्येक मुलाला फ्लोअर क्लीनरची बाटली देण्यातआली.

कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका व मान्यवर उपस्थित होते. संस्थेचे मुख्य विश्वस्त श्री राजेश पांडे, व इतर विश्वस्त मनोज पांडे, संतोष पांडे, प्रमोद पांडे आज उपस्थित होते शाळेच्या मुख्याध्यापिका पुष्प कला जैस्वार व शाळेतील इतर सर्व शिक्षकांनी मिळून हा कार्यक्रम यशस्वी केला.या उपक्रमामुळे विद्यार्थी आणि पालक यांना आपला परिसर स्वच्छ ठेवण्याची मूल्ये व तत्व समजली आणि शाळेच्या वतीने मुलांना मार्गदर्शन करत आपला परिसर आणि घर का आणि कसे स्वच्छ ठेवावे यावेळी सांगण्यात आले.

# सवाना सिड्स बियाणे शेतकऱ्यांना ठरतोय वरदान




**'सवाना सिड्स बियाणे शेतकऱ्यांना उत्पादन वाढीसाठी वरदान ठरत असून पुढील खरीप हंगामात सर्व शेतकरी सवाना कंपनीचे बियाणे खरेदी करतील असा विश्वास व्यक्त करतो'**
**- भास्कर शिद, शेतकरी**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/(प्रतिनिधी) –**

मुरबाड : मुरबाड तालुक्यात मौजे मढवाडी या आदिवासी वाडीतील प्रगतशील शेतकरी श्री भास्कर शिद यांनी आपल्या शेतीमध्ये सवान सीड्स कंपनीचे सुधारित वाण SRD ५५ पिक पाहणी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी गावातील इतरही प्रगतशील शेतकरी , सरपंच व विक्रेते उपस्थित होते. उपस्थित सर्वांना सिड्स कंपनीचे प्रतिनिधी वैभव विशे यांनी आधुनिक पद्धतीने शेती कशी करावी याचे मार्गदर्शन केले. कंपनीच्या विविध वाण ए-९११, मिनाक्षी व मार्शल भात बियाणे वाण विषयी शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

### जागतिक श्वान दंश दिन निमित्त

# चर्चासत्र/सभेचे आयोजन




डोंबिवली : दिनांक २८/०९/२०२४ हा जागतिक दंश दिन म्हणुन जगात साजरा करण्यात येतो. यानिमित्त आज शनिवारी सकाळी डोंबिवली च्या गणेश मंदिर मधील वक्रतूंड सभागृहात चर्चासत्र/सभेचे आयोजन रोटरी क्लब ऑफ डोंबिवली मिडटाऊन तर्फे करण्यात आले होते. यावेळी मुख्य अतिथी म्हणुन कल्याण डोंबिवली महापालिकेच्या मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. दिपा शुक्ल या उपस्थित होत्या.

सदर चर्चासत्राला प्राणी मित्र, रोटरीयन, शाळा/कॉलेज विद्यार्थी, शिक्षक वर्ग इत्यादी उपस्थित होते. या चर्चासत्रात सुरवातीला प्राणी मित्र, काही विद्यार्थी यांनी आपले विचार मांडले. रोटरी क्लबचे प्रकल्प प्रमुख डॉ. मनोहर अकोले यांनी जागतिक श्वान दंश दिन आयोजित करण्याच्या उद्देश सांगितला.

गेली तेरा वर्ष हा कार्यक्रम रोटरी क्लब ऑफ डोंबिवली मिडटाऊन यांच्या माध्यमातून करीत आहोत असे त्यांनी सांगितले. जागतिक आरोग्य संघटनेने रॅबीज रोगाचे उच्चाटन २०३० साल पर्यंत करण्याचे ठरविल्याने आम्ही आपल्या सर्वांच्या मदतीने याची जनजागृती करीत असल्याचे त्यांनी सांगितले. दिनांक १३/०९/२०२४ ते १९/०९/२०२४ या मुदतीत डोंबिवलीच्या विविध परिसरात श्वान दंश प्रतिबंधित लसीकरण करण्यात आले. यावेळी १६४८ भटके कुत्रे आणि ११२ मांजरी असे एकूण १७६० लसीकरण करण्यात आले. तसेच प्राणी मित्र, श्वान प्रेमी यांच्या मदतीने निर्बीजीकरण, उपचार -निगा, अन्नपाणी, निवारा इत्यादी सोयी या भटक्या कुत्र्यांच्या साठी केल्याने हे भटके कुत्रे शांत राहत असून त्यामुळे श्वान दंशाचे प्रमाण कमी होते. भारत हा रॅबीज रोगाच्या बाबतीत जगात दुसऱ्या आणि आशिया मध्ये पहिल्या क्रमांकावर आहे.

कल्याण डोंबिवलीत प्राण्यांसाठी अद्यावत रुग्णालय, मृत प्राण्यांसाठी शवागर- स्मशानभूमी, डोंबिवलीसाठी स्वतंत्र निर्बीजीकरण केंद्र, पाळीव श्वान धारकांना परवाना पद्धत सुरू करणे इत्यादी मागण्या डॉ मनोहर अकोले यांनी आपल्या भाषणात केल्या. डॉ. दिपा शुक्ल यांनी आपल्या भाषणात या कार्यक्रमाची स्तुती करून कल्याण डोंबिवली महापालिका यासाठी आपल्याला सहकार्य करेल तसेच आपल्या योग्य मागण्यांची पूर्तता करण्यासाठी आम्ही मनापासून प्रयत्न करू असे सांगितले. याप्रसंगी रोटरीचे प्रांतपाल श्री हर्ष मकोल, माजी अध्यक्ष श्री. अजय कुलकर्णी, प्रकल्प प्रमुख डॉ मनोहर अकोले हे उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. मकरंद गणपुले यांनी केले. आभार प्रदर्शन श्री अनिल हिरावत यांनी करून शेवटी पसायदान होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

टीपः- रॅलीचा कार्यक्रम हा पावसामुळे रद्द करण्यात आला होता. यानिमित्त आणलेले जनजागृतीचे फलक सभेत दाखविण्यात आले.

# भांडार्लीत ८० वर्षीय वृद्ध शेतकरी आजीचे आमरण उपोषण..




भूमिपुत्रांच्या न्याय हक्का साठी संपूर्ण गाव एकत्र..

दिवा : भंडार्लीत ८० वर्षीय वृद्ध शेतकरी महिला भूमीपुत्रांच्या न्याय हक्कासाठी आमरण उपोषणास बसल्या आहेत. उपोषण कर्त्या श्रीमती सुंदराबाई गोवर्धन पाटील (वय ८० वर्ष) यांनी आपल्या भंडार्ली सर्वे नं. १३ व गोठेघर सर्वे नं. १५७/१ येथे असलेल्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा विकासकाने कट कारस्थान करून इमारत बांधण्यासाठी हटवला असून त्यात सहभागी असणारे शिर्के बिल्डर, शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या वरती गुन्हा दाखल करुन सन्मानाने पुतळा तसेच वाचनालय उभे करावे. तसेच भंडार्ली व गोठेघर येथे गावाच्या विकासाच्या आरक्षित भुखंडावर अतिक्रमण करुन शिर्के बिल्डर यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामा वर तात्काळ कार्यवाही करावी, तसेच शिर्के बिल्डर यांनी भूमीपुत्रांची वडीलोपारजीत हक्काची अधिकृत घरे जबरदस्ती करुन तोडली असून शिर्के बिल्डर व त्या संबंधित अधिकाऱ्यावर कार्यवाही करुन नुसकान भरपाई मिळावी. तसेच शिर्के बिल्डर यांनी शेतकऱ्यांच्या जागे वर अनधिकृत भींत आणि लोखंडी जाळी लावून शेत रस्ते बंद केले. ते रस्ते चालू करुन द्यावे तसेच इतर मागण्या बाबत दि. २६/०९/२०२४ रोजी उत्तरशिव रोड भंडार्ली गांव येथे आमरण उपोषणास बसल्या आहे.

# राज्यस्तरीय कृषी पुरस्कार वितरण व सत्कार समारंभ

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/(प्रतिनिधी) –**

ठाणे : राज्यात कृषी, फलोत्पादन आणि संलग्न क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तसेच कृषी उत्पादन आणि उत्पन्न वाढीकरिता योगदान देणाऱ्या शेतकऱ्यांचा आणि कृषी विस्तारामध्ये बहुमोल कामगिरी करणाऱ्या व्यक्ती/ संस्था / गट/ अधिकारी/ कर्मचारी यांना महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत डॉ.पंजाबराव देशमुख कृषीरत्न, वसंतराव नाईक कृषीभूषण, जिजामाता कृषीभूषण, कृषीभूषण (सेंद्रिय शेती), उद्यान पंडीत, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, पीकस्पर्धा विजेते, पद्मश्री. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार प्रदान करुन सन्मानित करण्यात येते. राज्य शासनामार्फत सन २०२०, २०२१ व २०२२ या वर्षाच्या वरीलप्रमाणे नमूद केलेल्या एकूण ४४८ पुरस्कार्थीचा सत्कार व पुरस्कार वितरण कार्यक्रम राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या हस्ते रविवार दि. २९ सप्टेंबर २०२४ रोजी नॅशनल स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया (डोम ), वरळी, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेला आहे.

http://www.youtube.com/c/AgricultureDepartmentGoM या कृषी विभागाच्या युट्यूब चॅनेलवरुन तसेच https://www.facebook.com/AgricultureDepartmentGoM या फेसबुक पेजवरून या कार्यक्रमाचे थेट प्रसारण करण्यात येणार आहे. सर्वांनी याच्या थेट प्रक्षेपित कार्यक्रमामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे. सहभागासाठी वरील लिंकवर क्लिक करावे किंवा खालील QR कोड स्कॅन करण्यात यावा, असे महाराष्ट्र राज्य, पुणे कृषी आयुक्तालय, कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) विनयकुमार आवटे यांनी कळविले आहे.

# मध्यवर्ती रुग्णालयच जेव्हा असतं व्हेंटिलेटरवर

### औषधांचा तुटवडा ▌ लाखो रुपयांची औषध बिलं थकली
### पुरवठादाराकडून औषध पुरवठा बंद ▌ रुग्णांचे हाल




उल्हासनगर : उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात औषध बिलाची लाखो रुपयांची थकबाकी आहे, शासनाने अनुदान न दिल्याने मध्यवर्ती रुग्णालय प्रशासन पुरवठादारास थकीत बिल देण्यास असमर्थ आहे त्यामुळे पुरवठादाराने गेल्या चार महिन्यांपासून औषधे देणे बंद केले आहे. रुग्णालयात औषधे उपलब्ध नसल्याने गरीब व आदिवासी रुग्णांचे प्रचंड हाल होत आहेत.

राज्य सरकारने १५ ऑगस्ट २०२३ रोजी मोफत उपचार योजना सुरू केली. ही योजना उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयातही सुरु करण्यात आली. दरमहा सुमारे २००० ओपीडी रुग्ण येतात. याशिवाय मध्यवर्ती रुग्णालयात २०१ खाटांचे रुग्णालय आहे. त्यामध्ये रुग्णांवर मोफत उपचार केले जातात. या रुग्णालयात उल्हासनगर व्यतिरिक्त जवळच्या अंबरनाथ, बदलापूर, मुरबाड शहापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील गरीब व आदिवासी रुग्ण देखील उपचारासाठी येत असतात. औषधे, प्रयोग शाळेतील रसायने व अन्य इतर सामग्रीचा खर्च ३५ लाख १६ हजार ८२८ रुपये झाला या रकमेपैकी ३ लाख ६ हजार ५६० रुपये प्रयोगशाळेच्या साहित्याचा खर्च आहे मात्र गेल्या चार महिन्यापासून शासनाने अनुदान दिले नसल्याने औषधांचा पुरवठा बंद करण्यात आला आहे. रुग्णांना मोफत औषध देणे बंद करण्यात आल्याने रुग्णांना स्वतःच्या खर्चाने औषध घ्यावे लागते, यात गरीब, आदिवासी रुग्णांचे व त्यांच्या नातेवाईकांचे हाल होत आहे. दुसरीकडे मेडिकल स्टोअर्सचे मालक आपले उखळ पांढरे करून घेत आहेत. मोफत औषध योजना केवळ मध्यवर्ती रुग्णालयातच नाही तर बदलापूर ग्रामीण, अंबरनाथच्या छाया हॉस्पिटलमध्येही आहे.

याबाबत उल्हासनगर येथील मध्यवर्ती रुग्णालयाचे अधीक्षक डॉ मनोहर बनसोडे यांना विचारले असता ते म्हणाले की २५ सप्टेंबर २०२४ रोजी जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे यांना लेखी माहिती दिली आहे. पूर्वी केसपेपर आणि उपचारासाठी दहा रुपये घेतले जात होते त्यामुळे काहीतरी उत्पन्न मिळत होते. मात्र त्या नंतर सरकारने ते देखील बंद केल्याने उत्पन्नाचे स्तोत्र शिल्लक राहिलेले नाही. उल्हासनगर शहराचे मध्यवर्ती रुग्णालयातील कल्याण लोकसभा क्षेत्रात येत असून या क्षेत्राचे खासदार डॉ श्रीकांत शिंदे हे स्वतः डॉक्टर आहेत, त्यांच्या पुढकाराने अंबरनाथ शहरांमध्ये मेडिकल कॉलेजच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे तसेच उल्हासनगर महानगरपालिकेने स्वतःचे रुग्णालय ही सुरू केले आहे मात्र गेल्या चार महिन्यापासून मध्यवर्ती रुग्णालयात औषध उपलब्ध नसल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची परिस्थिती फार बिकट झालेली आहे याबाबत ते अनभिज्ञ असल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. शहरातील स्थानिक नेते देखील याप्रकरणी लक्ष देत नसल्याच्या तक्रारी सर्वसामान्य नागरिक करीत आहेत.

# म्हसा -मुळ्याचापाडा रस्त्याचे आमदार किसन कथोरेंच्या हस्ते भूमिपूजन



**मुरबाड :** मुरबाड विधानसभेत आमदार किसन कथोरेंच्या माध्यमातून विकास कामांचा झंझावात सुरु असून आज म्हसा मुळ्याचापाडा या सिमेंट कॉंक्रीटच्या सुमारे दोन कोटी रुपये अंदाजपत्रक असलेल्या रस्त्याचे भूमिपूजन आमदार किसन कथोरेंच्या हस्ते करण्यात आले. तालुका डांबरमुक्त झाला पाहिजे हे धोरण त्यांनी राबविले असून तालुक्यासह मतदार संघातील महत्वाच्या सर्व रस्त्यांचा दर्जा वाढवून सिमेंट कॉंक्रीटचे करण्याचे उदिष्ट ठेवले आहे. त्यासाठी कोट्यावधीचा निधी त्यांनी मतदार संघात आणला आहे. या भूमिपूजनासाठी उद्योजक श्री लाड, कान्होळ ग्रामपंचायतीच्या सरपंच रेश्मा घरत, म्हसा ग्रामपंचायतीच्या सरपंच जया घागस , भाजपा कोषाध्यक्ष बाळाशेठ घरत, सरचिटणीस नितीन मोहपे, बाजार समितीचे संचालक सुरेश बांगर, न्हावे सरपंच जगदिश हिंदूराव , जिवन कथोरे , प्रविण घागस,प्रदिप चौधरी, मगन घागस, सा.बा.विभागाचे उपअभियंता कैलास पतिंगराव, सूर्यभान अल्टे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# 'प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियान' कार्यक्रमाचे होणार थेट प्रक्षेपण

ठाणे : देशातील आदिवासी जमातींच्या आर्थिक व सामाजिक विकासाकरिता 'प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियान' ही योजना राबविण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. देशातील आदिवासी जमातीच्या बांधवांसमवेत दि.०२ ऑक्टोबर,२०२४ रोजी दूरदृष्यप्रणालीद्वारे संवाद साधून या योजनेच्या अंमलबजावणी कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण संपूर्ण देशभर करण्यात येणार आहे. दूरदृष्यप्रणालीद्वारे होणाऱ्या पंतप्रधान महोदयांच्या या कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपणासाठी ठाणे जिल्हयातील शांग्रिला रिसोर्ट, वडपे, ता. भिवंडी येथील शांग्रिला हॉल हे स्थळ निश्चित करण्यात आलेले आहे, असे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर, प्रकल्प अधिकारी राजेंद्रकुमार बी. हिवाळे यांनी कळविले आहे.

# डॉ.तृप्ती शिंदे यांनी शहापूर प्राथमिक आरोग्य केंद्रांना दिली भेट



ठाणे : प्रौढ क्षयरोग प्रतिबंध लसीकरण (बीसीजी) उपक्रमांची पडताळणी करण्यासाठी केंद्रीय क्षयरोग प्रतिबंध लसीकरण मोहीमेच्या डॉ. तृप्ती शिंदे यांनी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम टीमसह क्षयरोग पथक, शहापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, डोळखांब येथील डेहळे उपकेंद्र व मालद अंगणवाडी येथील लसीकरण सत्रास दि. २४ सप्टेंबर २०२४ रोजी भेट दिली. यावेळी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. अलका परगे, वैद्यकीय अधिकारी डॉ. तरुलता धानके, तालुका स्तरावरील कर्मचारी उपस्थित होते. केंद्र शासनाने २०२५ पर्यंत क्षयरोग मुक्त करण्याचे धोरण आखले आहे. क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत क्षयरोग मुक्त करण्यासाठी ठाणे जिल्हयामध्ये १८ वर्षावरील पात्र नागरिकांना ३ सप्टेंबर २०२४ पासून क्षयरोग प्रतिबंध लसीकरण (बीसीजी) करण्यात येत आहे. यानिमित्ताने जास्तीत जास्त पात्र लाभार्थींचा सहभाग वाढविण्यासाठी व जनजागृती करण्यासाठी केंद्रीय क्षयरोग प्रतिबंध लसीकरण मोहिमेच्या डॉ. तृप्ती शिंदे यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले.

# राज्यातील ४ हजार ९७५ आदिवासी गावांचा कायापालट होणार

### प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानात समावेश

**ठाणे** : दुर्गम अतिदूर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानाला केंद्र सरकारने हिरवा कंदील दाखविला आहे. त्यामुळे देशातील ६३ हजार तर महाराष्ट्रातील ४ हजार ९७५ आदिवासी गावांचा कायापालट होणार आहे. या माध्यमातून राज्यामधील ३२ जिल्ह्यांतील १२ लाख ८७ हजार ७०२ आदिवासी बांधवाचे सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरण केले जाणार आहे. या अभियानासाठी आवश्यक निधी केंद्र आणि राज्य सरकारकडून उपलब्ध होणार आहे.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानाची घोषणा केली होती. गेल्या आठवड्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कॅबिनेट बैठकीत या अभियानाला मंजुरी देण्यात आली. या अभियानाचा शुभारंभ ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. 'पीएम-जनमन' अभियानात १७ मंत्रालयांद्वारे राबवण्यात येणाऱ्या विविध २५ उपक्रमांचा समावेश असणार आहे. त्याद्वारे सामाजिक पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, अजीविका यामधील तफावत भरून काढण्याचा प्रयत्न असणार आहे. तसेच आदिवासी क्षेत्र आणि समुदायांच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासावर भर दिला जाणार आहे. प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानात सहभागी प्रत्येक मंत्रालयावर पुढील ५ वर्षात निश्चित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अनुसूचित जमातींचा विकास कृती आराखडा तयार करून उपलब्ध निधीद्वारे त्यांच्याशी संबंधित योजना कालबद्ध पद्धतीने कार्यान्वित करण्याची जबाबदारी असणार आहे. दरम्यान, या अभियानांतर्गत समाविष्ट असलेली आदिवासी गावे पीएम गतिशक्ती पोर्टलवर संबंधित विभागाद्वारे त्याच्या योजनेतून मॅप केल्या जातील. पोर्टलचे भौतिक आणि आर्थिक प्रगतीचे परीक्षण केले जाईल. सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यांना पुरस्कार देण्यात येणार आहे.

**या सुविधा मिळणार :-** पक्की घरे, ग्रामीण भागात रस्ते, प्रत्येक घरात शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय, सर्व घरांमध्ये वीज जोडणी, मोबाईल मेडिकल युनिटची स्थापना, आयुष्मान कार्ड, एलपीजी कनेक्शन, आदिवासी बहुउद्देशीय विपणन केंद्र, आश्रमशाळांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा, सिकल सेल ॲनिमियाशी लढण्यासाठी केंद्राची निर्मिती, होम स्टे.

**जिल्हानिहाय गावांची संख्या :-** ठाणे-१४६, पालघर-६५४, रायगड-११३, रत्नागिरी-१, अहमदनगर-११८, अकोला-४३,अमरावती-३२१, छत्रपती संभाजीनगर-११, बीड- २, भंडारा-१४, बुलढाणा-४३, चंद्रपूर-१६७, धुळे-२१३, गडचिरोली-४११, गोंदिया-१०४, हिंगोली-८१, जळगाव-११२, जालना-२५, कोल्हापूर-१,लातूर-२, नागपूर-५८, नांदेड-१६९,नंदुरबार-७१७, नाशिक-७६७,उस्मानाबाद-४,परभणी-५, पुणे-९९, सातारा-४, सोलापूर-६१, वर्धा-७२, वाशीम-७१, यवतमाळ-३६६ असे महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास विभाग आदिवासी आयुक्तालय, नाशिक जनसंपर्क अधिकारी नितीन रणशूर (मोबाईल नंबर ७६२०००६८३१) यांनी कळविले आहे.




२९ सप्टेंबर २०२४
रविवार

**मेष**
कोणत्याही जबाबदारीकडे दुर्लक्ष करणे टाळावे. तुमचे आरोग्य चांगले राहील. काम कमीत कमी वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न कराल.

**वृषभ**
आरोग्याच्या दृष्टीकोनातून आजचा दिवस चांगला जाणार आहे. काही महत्त्वाच्या कामामुळे किंवा मीटिंगमुळे तुम्हाला बाहेरगावी जावे लागेल.

**मिथुन**
या राशीचे विद्यार्थी ज्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशात जायचे आहे ते या संदर्भात कोणाचा तरी सल्ला घेऊ शकतात. पैशाच्या व्यवहारात सावध राहा.

**कर्क**
घर खरेदी करण्याचा विचार करणाऱ्या लोकांसाठी आजचा दिवस शुभ आहे. व्यवसाय करणाऱ्या लोकांचा व्यवसाय चांगला होईल.

**सिंह**
परदेशी सहलीलाही जावे लागेल. तुम्हाला ऑफिसमध्ये पूर्वीपेक्षा जास्त काम मिळू शकते, परंतु तुम्ही सर्व काही वेळेत पूर्ण कराल.

**कन्या**
आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. व्यवसायात तुम्हाला आज अचानक उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. आज तुमची आर्थिक स्थिती चांगली राहील. तुमचे

**तूळ**
प्रियकरासाठी दिवस चांगला जाणार आहे, तुम्ही एकत्र कुठेतरी बाहेर जाल. आज तुम्ही नवीन वाहन खरेदी करण्याचा निर्णय घ्याल.

**वृश्चिक**
जे खूप दिवसांपासून नोकरीच्या शोधात आहेत, त्यांचा शोध आज पूर्ण होऊ शकतो. सरकारी नोकरीसाठी तयारी करणाऱ्यांना चांगली बातमी मिळेल.

**धनु**
काम नक्कीच यशस्वी होईल.न्यायालयीन प्रकरणांमध्येही तुम्हाला चांगली बातमी मिळू शकते. तुमच्या जोडीदाराकडून पूर्ण सहकार्य मिळेल.

**मकर**
तुम्ही एखाद्या कामाचा नव्याने विचार करू शकता.बाजारात कोणत्याही प्रकारची गुंतवणूक करणार असाल तर सखोल संशोधन करूनच गुंतवणूक करा.

**कुंभ**
जे काम सुरू कराल ते वेळेवर पूर्ण करा. कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी किंवा सहकाऱ्याचे सहकार्य मिळू शकते. अनुभवी व्यक्तीचा सल्ला घ्या.

**मीन**
वैवाहिक नात्यात गोडवा राहील.तुमची एखाद्या प्रभावशाली व्यक्तीशी भेट होऊ शकते. भविष्यात ते तुमच्यासाठी खूप उपयुक्त ठरेल.

# आदिवासींच्या सेवेसाठी धावणारा 'आरोग्यदूत'





आरोग्य व सामाजिक क्षेत्रामध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल डॉ. अशोक बेलखोडे यांना पुणे येथे मराठवाडा मुक्ती महोत्सव २०२४ निमित्त मराठवाडा भूषण या सामाजिक पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले आहे त्या निमीत्ताने...

नांदेड पासून १५० कि. मी. वर असणारा आदीवासी ,नक्षली व अतीदुर्गम तालुका म्हणजेच किनवट तालुका. अश्याया मागासलेल्या तालुक्यात ३० वर्षापूर्वी महात्मा गांधी व साने गुरुजींच्या यांच्या विचारधारेने प्रेरित होऊन आदीवासींच्या सेवेचे व्रत घेऊन, शहरातील सुखसुविधा सोडून डॉ. अशोक बेलखोडे हे किनवटला आले. बाबा आमटेंना ते प्रेरणास्थान मानतात आणि लोकंही त्यांना बाबा आमटेंचे सेवाव्रत्ती मानसपुत्र मानतात आपल्या ज्ञानाचा व कौशल्य चा उपयोग समाजातील शेवटच्या माणसाला व्हावा असा ध्यास घेउन मी मरे पर्यंत किनवट सोडणार नाही असे वचन बाबांना देऊन १९९३ साली किनवटला आले व येथे आरोग्य सेवेचे कार्य सुरू केले व आज ही अविरत पणे सुरू आहे.

डॉ. अशोक बेलखोडे यांचा जन्म (१३ सप्टेंबर १९५९) रोजी नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यातील कोतेवाडा गावात झाला त्यांच्या वडिलांनी सुरवातीला काही काळ शिक्षकाची नोकरी केली व नंतर आयुष्यभर शेतीच केली.

घरी पुरेशी शेती होती. तेली समाजातल्या कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या घरात वारकरी संप्रदाय ,आध्यात्मिक व संस्कारशील वातावरण होते .त्यांच्या जडणघडण व एकूणच कारकीर्दीवर त्याच्या वरील ससंस्काराचा प्रभाव दिसतो.

अशा वातावरणात वाढलेले डॉ.बेलखोडे १९७४ मध्ये शालांत परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांचे प्राथमिक शिक्षण गावातल्या शाळेत तर माध्यमिक शिक्षण जवळच्या गुमगाव येथे झाले. १० वी नंतरचे प्रीडिग्रीचे दोन वर्षाचे शिक्षण नागपूरला झाले. पुढील एमबीबीएस व एमएसचे शिक्षण मात्र औरंगाबादला पूर्ण झाले. शिक्षणाच्या निमित्ताने मराठवाड्याशी त्यांचे नाते अधिक घनिष्ठ जूळले व आज पर्यंत ते कायम आहे.

औरंगाबादमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेत असतांना त्यांचा आरोग्य चळवळी विषयी जनजागृती करणाऱ्या हॅलो या विद्यार्थी चळवळीशी संपर्क आला यामुळे त्यांच्या पुढील आयुष्यास वेगळी दिशा मिळाली.ग्रामीण भागात गरीब व गरजू रुग्णांची सेवा हा या चळवळीचा हेतू होता .या चळवळीचे संस्थापक डॉ. शशिकांत अहंकारी यांच्याशी या निमित्ताने डॉ. बेल खोडे यांचा संबंध आला. या निमित्तानेच डॉ. बेलखोडे खऱ्या अर्थाने सामाजिक कार्यात सक्रिय झाले. याच काळात डॉ. बेलखोडे ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटेंच्या भारत जोडो यात्रेकडे आकर्षित झाले होते. राष्ट्र सेवा दलाशीही त्यांचा या निमित्ताने संबंध आला. पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण चालू असतांना ते बाबा आमटेंच्या १९८५च्या पहिल्या भारत जोडो सायकलयात्रेत सहभागी झाले होते.मराठवाडा वृत्तपत्राचे संपादक कै. अनंतराव भालेराव यांच्या प्रेरणा, सहकार्य व प्रोत्साहनाने डॉ. बेल खोडे यात्रेत सहभागी झाले होते .खरेतर १९८५च्या सुरवातीलाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले होते. तरी देखील त्यांनी यात्रेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला.

पाच महिन्यांच्या कालावधीत १२५ युवकांसह सुमारे पाच हजार किलोमीटर १०५ दिवसात कापत ही कन्याकुमारीवरून सुरु झालेली यात्रा जम्मूला पोहोचली. या भारत जोडो यात्रेशी ते एवढे प्रेरित झाले होते की पुढे देखील १९८७ मध्ये मध्ये दुसरी सायकलवरची भारत जोडो यात्रा निघाली तेव्हा ते तर संपूर्ण यात्रेचे 'समन्वयक' बनले होते. पाच महिन्यांच्या कालावधीत १२५ युवकांसह सुमारे साडेसात हजार किलोमीटर अंतर १४६ दिवसात कापत ही अरुणाचल प्रदेशातील इटानगर येथून सुरु झालेली यात्रा गुजरात मधील ओखा येथे समाप्त झाली.

पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी दीड वर्ष कोकणातील मातृमंदिर संस्थेतही वैद्यकीय सेवेचे काम केले होते. यानंतर १९९०-९२ मध्ये त्यांनी औरंगाबाद जिल्ह्यातील पाचोड व त्यापाठोपाठ गंगापूर तालुक्यातील जिकठाण येथे सरकारी दवाखान्यात नोकरी केली. यादरम्यान 'किनवटचे दिवस' हे डॉ. अरुण गद्रे यांचे पुस्तक त्यांच्या वाचनात आले. त्यातून नांदेड जिल्ह्यातील किनवटसारख्या आदिवासी व अत्यंत मागास भागात काम करण्याचा विचार त्यांच्या मनात आला.मग मनाचा दृढ निश्चय करून आदिवासी सेवेचा वसा घेऊन ते १९९३ ला किनवट ला आले .किनवट ला आल्यावर डॉ. बेल खोडे यांनी लातूरला 'भारत जोडो युवा अकादमी' या संस्थेची स्थापना केली. संस्थेचे काम चालू करण्यापूर्वी काहीतरी आर्थिक सोय लावण्याहेतून यांनी १९९३ मध्ये किनवटला सरकारी नोकरी स्वीकारली. एकूण कारकिर्दीत १३ वर्षे त्यांनी सरकारी नोकरी केली.

किनवट हा मराठवाड्यातील एकमेव आदिवासी तालुका आहे. या समाजातील लोक मोठ्या संख्येने दारिद्र्य रेषेखालचे जीवन जगणारे होते. १९९५ मध्ये डॉ.बेलखोडे यांनी किनवटमध्ये साने गुरुजी रुग्णाल याची स्थापना केली. १५ खाटांनी सुरुझालेल्या रुग्णाल याची क्षमता पुढे २५ पर्यंत वाढत गेली.

या रुग्णालयामुळे तालुक्यात प्रथमच पॅथॉलॉजी ऑपरेशन थिएटर, ईसीजी, रक्तसाठा केंद्र अल्ट्रासोनोग्राफी, एक्स रे ,फिजिओथेरपी, डायलिसिसची सुविधा झाली. स्टेट बँक ऑफ इंडियातर्फे २०10 मध्ये रुग्णाल यास एक रुग्णवाहिका देण्यात आली.याचदरम्यान फिरोदिया ट्रस्ट तर्फे अजून एक वातानुकूलित व सुसज्ज रुग्णवाहिकाही रुग्णालयाला देण्यात आली, तसेच आताच रोटरी क्लब पुणे तर्फे मम्मी ही आधुनिक रुग्णवाहिका देण्यात आली आहे . आज रुग्णालयात येणाऱ्या व्हीजीटिंग डॉक्टरांमुळे आता अस्थिचिकित्सा, दंतचिकित्सा, नेत्रचिकित्सा, मानसोपचार,मेंदू चिकित्सा,आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. तसेच गेल्या अनेक वर्षांपासून किनवट व माहूर तालुक्यातील निवडक दुर्गम २५ गावांसाठी 'फिरता दवाखाना' चालू केला आहे. आज याचा लाभ सुमारे २५ ते ३५ हजार गरीब आदिवासी रूग्णांना होत आहे. यासाठी मुंबईच्या उघ्ण या संस्थेने छोटे वाहन उपलब्ध करून दिले आहे. या दवाखान्यामुळे अतिदुर्गम भागातील गरीब रुग्णांना त्यांच्या दारापर्यंत आरोग्य सेवा उपल ब्ध झाली आहे.

डॉ. बेलखोडे यांचे कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करण्याबाबतचे कार्य देखील अत्यंत उल्लेखनीय व दखलपात्र असे आहे. त्यांनी आत्तापर्यंत सुमारे १ लाखाच्यावर शस्त्रक्रिया केल्या आहेत. हा देखील एक विक्रमच आहे. सरकारी रुग्णालयात झालेल्या या सर्व शस्त्रक्रिया मराठवाड्यातील नांदेड, लातूर व हिंगोली आणि विदर्भातील यवतमाळ, चंद्रपूर, वाशीम, अमरावती व बुलढाणा या जिल्ह्यात केल्या. त्यासाठी सुमारे २ लाख किलोमीटरचा प्रवास त्यांनी केला आहे.

**-डॉ.राहुल रामप्रसाद तौर**
**कल्याण.**

कुटुंब नियोजानासारख्या राष्ट्रीय कार्यात आपला सहभाग असावा उद्देशाने डॉ. बेलखोडे हे काम करतात. टाक्याच्या शस्त्रक्रियेत ओली बाळंतीण असलेल्या ग्रामीण महिलेला दयनीय अवस्था व अनास्था असलेल्या सरकारी रुग्णालयात आपल्या बाळासह सात दिवस राहावे लागते. याउलट दुर्बिणीद्वारे बिनटाक्याच्या शस्त्रक्रियेत एका दिवसात घरी जाता येते. हे कळल्यावर डॉ. बेल खोडे यांनी तातडीने पुण्याला जाऊन याबाबत सविस्तर प्रशिक्षण घेतले व पुढील सर्व शस्त्रक्रिया त्या प्रकारच्या केल्या. कुटुंबनियोजनाच्या दृष्टीने सुटसुटीत असणारे पुरुष नसबंदी ही शस्त्रक्रिया ते विनामूल्य करतात. या शस्त्रक्रियेचा ते नेहमी आग्रहही धरतात व त्याबाबत प्रबोधनही करतात.

किनवट परिसरातील आरोग्य विषयक प्रश्न मांडताना डॉ बेलखोडे यांनी एकेक विषय घेऊन त्या प्रश्नांना वाचा फोडली व त्या प्रश्नांची शासनदरबारी दखल घेण्यास भाग पाडले. यात हैड्रोसिल (अंडवृध्दी), स्त्रिया व मुलीं मधील ॲनिमिया, गलगंड, सिकल सेल, गर्भाशयमुख व स्तनाचा कॅन्सर इत्यादी विषयांना त्यांनी हात घातला.

भारत जोड युवा अकादमी तर्फे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचा आरोग्य मित्र व रुग्ण सहाय्यक या अभ्यासक्रमांचे संचालनही रुग्णालयातर्फे सध्या करण्यात येत आहे. आतापर्यंत २०० च्या वर आदिवासी मुलींनी हे प्रशिक्षण घेऊन त्या स्वयंनिर्भर झालेल्या आहेत.याच बरोबर डॉक्टरांचे शैक्षणिक कार्य देखील उल्लेख आहे.किनवट व बोधडी येथे प्राथमिक शाळा, चित्रकला महाविद्यालय,इस्लापुर येथे वरिष्ठ महाविद्यालय स्थापन करून किनवट सारख्या अतिदुर्गम भागात शिक्षणाची ज्ञानगंगा उभी केली आहे. किनवटसारख्या भागात मराठी विज्ञान परिषदेतर्फे तालुका विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र चालू करण्यात आले आहे.

राष्ट्र सेवा दलाची लहान मुलामुलींसाठीची उन्हाळी शिबिरे, शिक्षकांसाठीची खेळ व गाणी प्रशिक्षण, कथाकथन इत्यादी शिबिरे तसेच दरवर्षी भव्य चित्रकला स्पर्धा, रांगोळी, हस्तकला स्पर्धा आयोजन इत्यादी व्यक्तिमत्व विकासात भर टाकते. देशाचे भवितव्य युवा पिढीच्या हातातच असते याकरिता अनेक स्थानिक, जिल्हा, विभागीय, राज्य व राष्ट्रीय पातळीवरील युवा शिबिरांचे आयोजन संस्थेने किनवट येथे केले आहे.

राष्ट्रीय एकात्मता हा शिबिराचा मुख्यहेतू आहे. या निमित्ताने अनेक मान्यवरांचे मार्गदर्शन युवा पिढीला मिळाले आहे.याच प्रमाणे महिला सबलीकरण, सक्षमीकरण, जलसंधारण या क्षेत्रातही त्यांचे उल्लेखनीय कार्य आहे.रुग्णालय सांभाळत सांभाळत डॉक्टरांनी असा हा सामाजिक कार्याचा डोंगर किनवट येथे उभा केला आहे. यामुळे आत्तापर्यंत डॉ. बेलखोडे यांना मोठ्या संख्येने विविध पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी नांदेडचा प्रमिल ताई भालेराव (२००९), महाराष्ट्र फौंडेशनचा सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार (२०१४), मराठवाड्यातील गोविंदभाई श्रॉफ पुरस्कार व पुण्यातील नातू फौंडेशनचा 'म.ब.नातू पुरस्कार' (२०१५) स्वातंत्र्य सेनानी श्यामराव बोधनकर पुरस्कार हे विशेष उल्लेखनीय पुरस्कार आहेत.

या परिसरातील मागील पंचविस -तीस वर्षाचा अनुभव व आरोग्य विषयक उणीवा व गरजा लक्षात घेऊन भारत जोडो युवा अकादमी या संस्थेने 'साने गुरूजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल' हा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. या शंभर बेड्सच्या प्रकल्पाच्या पहिल्या टप्याचे बांधकाम आता शेवटच्या टप्यात आहे. भविष्याचा वेध घेणारा हा प्रकल्प पूर्णपणे लोकसहभागातून व दानशूरांच्या मदतीतून उभा राहतो आहे. हा प्रकल्प पूर्णत्वाला येण्यासाठी गरज आहे ती सामुहिक मदतीची . या करीता समाजातील दानशूर व्यक्ती ,सेवाभावी संस्था, कंपन्या, सीएसआर कंपन्या व परदेशी-भारतीय नागरिक यांनी या प्रकल्पासाठी मदत करून डॉ.अशोक बेलखोडे यांनी उभारलेल्या आरोग्य चळवळी साठी आपले योगदान द्यावे असे आवाहन करण्यात येत आहे. हा प्रकल्प निश्चितच पूर्णत्वाला जाईल व लवकरच लोकसेवेसाठी कार्यरत होईल असा ठाम विश्वास किनवटवासीयांनी व्यक्त केला आहे.

## मुरबाड तालुक्यात शेतकऱ्यांसाठी 'शेतकरी भवन' उभारणार

### माजी आमदार गोटीरामभाऊ पवार यांचे प्रतिपादन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/(प्रतिनिधी)-**



मुरबाड : मुरबाड तालुक्यातील शेतकऱ्यांच्यासाठी शेतकरी भवन उभारणार असे प्रतिपादन माजी आमदार गोटीरामभाऊ पवार यांनी मुरबाड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात आयोजित केलेल्या बाजार समितीच्या वार्षिक सभेत केले.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार गोटीरामभाऊ पवार. ठाणे जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष सुभाष पवार, खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन रामभाऊ दळवी, ठाणे जिल्हा परिषद माजी सदस्य उल्हास बांगर,बाजार समितीचे सभापती बाळकृष्ण चौधरी, बाजार समितीचे माजी सभापती चंद्रकांत बोस्टे, लक्ष्मण सरनिंगे ,उपसभापती गुरुनाथ झुंजारराव, संचालक दिपक खाटेघरे, ॲड अशोक फनाडे, धर्माजी धलपे, सुनील घागस , सुरेश बांगर, अशोक मोरे, भारती पष्टे, विद्या धारवणे, बँकेचे माजी संचालक रघुनाथ बांगर, ॲडिटर धनाजी दळवी, यांच्यासह तालुक्यातील सेवा सोसायटीचे चेअरमन / व्हाईस चेअरमन, सरपंच / उपसरपंच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मुरबाड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वार्षिक पुस्तकाचे अहवालचे वाचन बाजार समितीचे सचिव दशरथ भगत यांनी इतिवृत्त व आर्थिक पत्र वाचून दाखवले यावर सविस्तर सभेत चर्चा करण्यात आली.

त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी मुरबाड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आर्थिक बाबत सर्वांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की खऱ्या अर्थाने यापूर्वीची बाजार समिती व आत्ताची बाजार समिती याच्यामध्ये फार मोठ्या प्रमाणात बदल होत आहे आर्थिक स्थिती चांगली सुधारत आहे अशा प्रकारच्या भावना मान्यवरांनी व्यक्त केल्या. अध्यक्षीय भाषणात माजी आमदार गोटीरामभाऊ पवार पवार म्हणाले मुरबाड कृषी उत्पन्न बाजार समितीची घोडदौड पाहता सध्याच्या घडीला बाजार समितीचे काम चांगल्या प्रकारे सुरू आहे त्यामुळे येत्या काही काळातच मुरबाडच्या शेतकऱ्यासाठी शेतकरी भवन उभारणार असल्याची माहिती यावेळी माजी आमदार गोटीरामभाऊ पवार यांनी दिली. पुढे बोलताना पवार म्हणाले की आपल्या बाजार समितीला शासनाकडून दीड कोटी रुपयाचे येणे बाकी आहे त्यामुळे बाजार समिती नफ्यामध्ये येत आहे त्यामुळे सर्व बाजार समितीचे संचालक सभापती उपसभापती अतिशय मन लावून काम करत आहेत तसेच कर्मचारी सुद्धा मेहनत घेऊन बाजार समितीचे भरभराड कशी होईल याकडे लक्ष देऊन काम करत आहेत तसेच सर्व कर्मचाऱ्यांचे कौतुक माजी आमदार गोटीरामभाऊ पवार यांनी केले.तर पुढे बोलताना पवार म्हणाले की बाजार समितीच्या स्थावर मालमत्ता १४ एकर०९ गुंठे ही जागा बाजार समितीच्या अधिपत्याखाली आहे अशी माहिती पवारांनी या वार्षिक सभेत दिली. कार्यक्रमाचे आभार बाजार समिती संचालक सुनील घागस यांनी मानले.

## कल्याणच्या सिंडीकेट परिसरात भलेमोठे झाड कोसळून घरांचे नुकसान



### घरांच्या दुरुस्तीची आमदार विश्वनाथ भोईर यांची ग्वाही

कल्याण : गेल्या दोन दिवसांपासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे कल्याण पश्चिमेच्या सिंडीकेट परिसरात घरांवर भले मोठे झाड कोसळल्याची घटना घडली आहे. यामध्ये तीन घरांचे नुकसान झाले असून सुदैवाने कोणालाही दुखापत झाली नाही. रेल्वेने घातलेल्या लोखंडी कंपाऊंडमुळे हे झाड संपूर्णपणे उन्मळून पडले नाही. अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती. तर पडझड झालेल्या घरांची संपूर्णपणे दुरूस्ती करून देण्याची ग्वाही कल्याण पश्चिमेचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी दिल्याने या कुटुंबियांना मोठा दिलासा मिळाला आहे.

कल्याण पश्चिमेच्या सिंडीकेट येथील नेहरू नगर, आतिश खान कंपाऊंड परिसरात आज सकाळी साडे ६ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. हा प्रकार घडला त्यावेळी घरांमध्ये तीन व्यक्ती उपस्थित होत्या. सकाळी साखरझोपेत असतानाच झाड पडल्याचा अचानक मोठा आवाज झाला. रेल्वे ट्रॅकशेजारी असलेले हे भलेमोठे झाड रेल्वेच्या लोखंडी कंपाऊंड पलिकडे असलेल्या या घरांवर कोसळले.

तर या घटनेबाबत केडीएमसी अग्निशमन दलाला पाचारण केले असता अग्निशमन दलाचे जवान लगेचच घटनास्थळी दाखल झाले अग्निशमन दलाचे जवान आणि स्थानिक नागरिकांच्या मदतीने या तिन्ही घरांमध्ये अडकून पडलेल्या ३ नागरिकांना बाहेर काढण्यात आले. या घटनेमध्ये तिन्ही घरांचे मोठे नुकसान झाले असून रेल्वेच्या लोखंडी कंपाऊंडमुळे हे झाड पूर्णपणे पडण्यापासून रोखले गेले.

अन्यथा याठिकाणी मोठी दुर्घटना झाली असती अशी माहिती प्रत्यक्षदर्शिंनी दिली. हे झाड इतके मोठे होते की अग्निशमन दलाचे कर्मचारी सकाळी सात वाजल्यापासून दुपारी चार वाजेपर्यंत त्याला कापून बाजूला करण्याचा प्रयत्न करत होते.दरम्यान या घटनेची माहिती स्थानिक लोकप्रतिनिधी गणेश जाधव यांनी आमदार विश्वनाथ भोईर यांना कळवली. त्यावर आमदार भोईर यांनीही तातडीने घटनास्थळी धाव घेत अग्निशमन दलाकडून केल्या जाणाऱ्या बचाव कार्याची पाहणी केली. तसेच हे झाड ज्या कुटुंबियांच्या घरांवर पडले होते त्या कुटुंबीयांशी संवाद साधला. हे झाड बाजूला करण्याचे अग्निशमन दलाचे काम जसे संपेल तसे लगेचच पडझड झालेल्या या घरांच्या संपूर्ण दुरुस्तीचे काम सुरू केले जाईल अशी ग्वाही आमदार विश्वनाथ भोईर यांनी यावेळी दिली.तसेच या घरांचे काम पूर्ण होईपर्यंत त्यातील कुटुंबियांच्या राहण्या आणि खाण्याची पुढील २-३ दिवसांची सुविधाही आमदार भोईर यांच्याकडून उपलब्ध करून देण्यात आली आहे. आमदार विश्वनाथ भोईर यांच्या या संवेदनशीलतेबद्दल त्याबद्दल स्थानिक रहिवाशांनी त्यांचे आभार मानले आहेत.

## 'मुख्यमंत्री योजनादूत' करिता अर्ज करण्यास ३० सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/(प्रतिनिधी)-**

ठाणे : माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत 'मुख्यमंत्री योजनादूत' उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत राज्यात ५० हजार योजनादूतांची निवड करून त्यांना सहा महिन्यासाठी दरमहा १० हजार रुपये मानधन दिले जाणार आहे. मुख्यमंत्री योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांना देतील. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करण्यासाठी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळाला भेट द्यावी.

मुख्यमंत्री योजनादूत उमेदवार पात्रतेचे निकष :- वय १८ ते ३५ वर्षे, कोणत्याही शाखेचा पदवीधर व संगणक ज्ञान आवश्यक, महाराष्ट्राचा अधिवासी असणे आवश्यक, बँक खाते आधार क्रमांक संलग्न आवश्यक.

निवडीसाठी कागदपत्रे :- विहित नमुन्यातील ऑनलाईन अर्ज, आधारकार्ड, पासपोर्ट साईज फोटो, पदवी प्रमाणपत्र,

रहिवासी दाखला (सक्षम यंत्रणेच्या सही शिक्क्यासह), वैयक्तिक बँक खात्याचा तपशिल.

शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी 'मुख्यमंत्री योजनादूत' उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या योजनेला मिळणारा प्रतिसाद पाहता मुदतवाढ देण्यात आली असून आता इच्छुक उमेदवारांना ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत नोंदणी अर्ज करता येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर अर्ज करावा, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत करण्यात आले आहे. मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ., अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. दि.३० सप्टेंबर २०२४ पर्यंत इच्छुक उमेदवारांना www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल. योजनादूत पोर्टलवर ज्या उमेदवारांनी नोंदणी केली आहे अशा उमेदवारांनी ज्ज्त्ब बटन दाबून अर्ज एल्सू करायला विसरू नये. तरच नोंदणीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

## आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यक्रम संपन्न

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/(प्रतिनिधी)-**

ठाणे : २८ सप्टेंबर हा दिवस 'आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिनाच्या पार्श्वभूमीवर आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समिती सभागृहात नायब तहसिलदार तथा जनसंपर्क अधिकारी संतोष मांडवे यांच्या प्रमुख उपस्थितीत 'आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन' कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील संतोष सोनावणे, सुभाष मोरे, गोरोबा पवार, स्वप्नील मुणगेकर, राकेश धादवड, हरिष देसले, गौतम शिनगारे, श्रीम.डी.एस गायकवाड, अर्चना सुशिल पाटील, समृध्दी भोईर, वैशाली तळपे व इतर कर्मचारी उपस्थित होते.यावेळी मार्गदर्शन करताना नायब तहसिलदार तथा जनसंपर्क अधिकारी संतोष मांडवे म्हणाले की, माहिती अधिकार अधिनियम-२००५ या कायद्याला जवळपास १८ वर्षे पूर्ण होत आहेत. या कायद्याचा उद्देश शासन व प्रशासन पारदर्शक पध्दतीने चालावे, हा आहे. माहितीचा अधिकार याचा अर्थ कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार आहे. यामध्ये एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे, दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिप्पण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे, सामग्रीचे प्रमाणित नमूने घेणे आदींचा समावेश या अधिकारात असल्याचे सांगितले. तसेच माहिती पुरविण्याची जबाबदारी, कलम-६(१) अंतर्गत अर्ज तपासणी सूची, पत्रव्यवहार करताना घ्यावयाची दक्षता याबाबत मार्गदर्शन केले.

## विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक/नोडल अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण संपन्न

ठाणे : आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे, अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघातील सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, DLTs, ALTs व सर्व नोडल अधिकारी, समन्वय अधिकारी यांचे दोन दिवसीय प्रशिक्षण दि. २५ व २६ सप्टेंबर २०२४ रोजी जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे पार पडले.

या प्रशिक्षणामध्ये अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे, अतिरिक्त अभियान संचालक श्रीमती सुषमा सातपुते,अपर जिल्हाधिकारी तथा मुख्य नियंत्रक अनाधिकृत बांधकाम सिडको, नवी मुंबईचे श्री. संजय जाधव, इब्राहिम चौधरी, उपजिल्हाधिकारी संभाजी अडकुने, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी नरेंद्र भामरे, अपर जिल्हाधिकारी मुख्य भूमी अधिकारी विजयसिंह देशमुख, नवी मुंबई आंतराष्ट्रीय प्रभावित क्षेत्र सुकेशिनी पगारे, अपर जिल्हाधिकारी मुख्य भूमी व भूमापन अधिकारी दीपक क्षिरसागर, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे उपजिल्हाधिकारी विकास पाटील, उपजिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, जिल्हा परिषदचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरुडकर, ठाणे महानगरपालिकाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिलीप सूर्यवंशी, नवी मुंबई महानगरपालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, नवी मुंबई महानगरपालिका उपायुक्त शरद पवार, सुनिल भुताने, जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप, जिल्हा पुरवठा अधिकारी विकास गजरे, अंजली कानडे, उदय किसवे, तहसिलदार स्मिता मोहिते यांनी मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षण वर्गात यावेळी नामांकन, छाननी, निवडणूक चिन्ह वाटप, अपात्रता, कायदा आणि सुव्यवस्था, पोस्टल मतपत्रिका, खर्चाचे निरीक्षण, माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समिती, पेड न्यूज, मतमोजणी आणि निकाल जाहीर करणे इत्यादी बाबींशी संबंधित विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ मध्ये करावयाच्या कार्यवाहीबाबत संगणकीय सादरीकरणाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विधानसभा मतदार संघातील निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, नोडल अधिकारी, समन्वयक अधिकारी उपस्थित होते. या प्रशिक्षण वर्गाचे सूत्रसंचलन नायब तहसिलदार स्मितल यादव यांनी केले.

## आमचा महाराष्ट्र, आमचं...

पान १ वरून >>

आठवड्यातील मधल्या दिवशी निवडणुका घ्याव्यात. जेणेकरुन लोक सुट्ट्या घेऊन बाहेर जाऊ नयेत. लोकांनी मतदान करावे'.

'मतदान केंद्रावर सोयी सुविधा देण्याची मागणी काही पक्षांनी केली आहे. बूथ एजंट त्याच भागातील असण्याऐवजी मतदारसंघातील ठेवण्याची मागणी पक्षांनी केली आहे. २६ नोव्हेंबर रोजी विधानसभेचा कार्यकाळ संपणार आहे. त्याआधी राज्यात विधानसभेच्या निवडणुका व्हायला हव्यात, असेही त्यांनी सूचित केले.

'महाराष्ट्रात १०० वर्षांवरील मतदारांची संख्या ४९ हजार इतकी आहे. महाराष्ट्रात एक लाख ८६ हजार मतदान केंद्र असतील. शहरी आणि ग्रामीण भागात जवळपास सारखीच मतदान केंद्रे असतील. मतदान केंद्रावर मोठ्या रांगा टाळण्यासाठी दिशादर्शक ठेवणार आहोत. रांगेतल्या मतदारांना बसण्यासाठी खुर्च्याही उपलब्ध करुन देणार आहेत, असे त्यांनी सांगितले.

'कुलाबा, कल्याण, पुणे, कुर्ला या विधानसभा मतदारसंघात कमी मतदान होतं. यामुळे लोकांनी मतदानासाठी बाहेर पडावं. जम्मू काश्मीरपेक्षाही कमी मतदान महाराष्ट्रात काही भागात होत आलंय. यामुळं मतदारांनी मतदानासाठी घराबाहेर पडावे. नागरिकांनी आपल्या हक्कासाठी, अधिकारासाठी मतदारांनी घराबाहेर पडावे, असे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी मतदारांना आवाहन केलं.

## 'लाडक्या बहिणीं' ना...

पान १ वरून >>

महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत महिला महामेळाव्या प्रसंगी उपमुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. सावत्र भावांपासून महिलांनी सावध राहावे, त्यांच्या पोटात दुखायला लागले आहे. लाडकी बहीण योजना, मुलींना मोफत शिक्षण, मोफत गॅस सिलेंडर या योजनेतून देण्यात येणारा हा पैशाचा चुराडा व अपव्यय आहे, असे म्हणत या योजनांना स्थगिती द्यावी अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व त्यांचे निवडणूक प्रमुख यांनी उच्च न्यायालयात केली आहे. परंतु मी त्यांना सांगतो आम्ही या योजनांना स्थगिती येऊ दिली नाही व येऊ देणार नाही. आम्ही तीन भाऊ सक्षम असून विरोधकांनी आमची चिंता करू नये, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## 'माझी वसुंधरा' अभियानात...

पान १ वरून >> गौरव करण्यात आला आहे.त्यामुळे ग्रामपंचायत फांगुळगव्हाण चे सरपंच सविता रवींद्र भला, उपसरपंच राजु आंबो भला, सदस्य, लक्ष्मी शंकर भला, मनिषा किरन कारभळ, विमल सोनू पोकळा, दगडाबाई कल्पेश खाकर, पांडुरंग शंकर साबळे, तानाजी देऊ भला, विठ्ठल काऊजी भला, आणि ग्रामसेवक बाळू कोकणे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे.

तर हे यश मिळण्यासाठी ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, डेप्युटी सीईओ श्री काळे, तत्कालीन गटविकास अधिकारी श्वेता पालवे मॅडम यांचे अमुल्य मार्गदर्शन, तसेच गटविकास अधिकारी श्री राठोड, समन्वयक आयुक्त कार्यालय अमोल पडळकर, ऐ बिडिओ सुरोशे, विस्तार अधिकारी श्री भोसले, मुरेकर, कृषी अधिकारी जाधव, चौधरी, श्री गायकवाड, आदींनी विशेष सहकार्य केले. त्यांचे ग्रामपंचायतीने आभार मानले. आणि माझी वसुंधरा ५,०अभियानात अधिक जोमाने सहभागी होण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे फांगुळगव्हाण च्या सरपंच सौ सविता रवींद्र भला यांनी सांगितले. ग्रामपंचायत फांगुळगव्हाण नी माझी वसुंधरा अभियानात पटकावले ला तिसरा क्रमांक हा ऐतिहासिक मुरबाड तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा असल्याचे मत आमदार किसन कथोरे यांनी व्यक्त केले.

## अमित शहांनी घेतला...

पान १ वरून >>

**गुजरात पॅटर्न लागू होणार का?** अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

**भाजपचा गुजरात पॅटर्न काय?**

२०२२ मध्ये गुजरात निवडणुकीपूर्वी भाजपवर मतदारांची मोठी नाराजी होती. त्यामुळे भाजप नेतृत्त्वानं ९९ विद्यमान आमदारांपैकी तब्बल ५८ आमदारांचे तिकीट कापले होते. या जागेवरून भाजपने नवीन उमेदवार उभे केले, ज्यांच्या झोळीत मतदारांनी भरभरून मतदान केले. महाराष्ट्रात भाजप आमदारांची संख्या १०३ इतके आहे. म्हणजेच ५० ते ६० आमदारांना पुन्हा तिकीट मिळण्याची अत्यंत कमी शक्यता आहे. हे आमदार नेमके कोण असतील, हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.

## ठाणे स्टेशनवर ८ मजली...

पान १ वरून >>

आणि सोलर पॅनेल असतील. ही इमारत एक कम्प्युटर हब म्हणून काम करेल आणि २०२७ च्या सुरुवातीला पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. बांधकाम २०२५ च्या मध्यात सुरू होणार आहे. विकासकांना ६ नोव्हेंबरपर्यंत त्यांच्या बोली सादर करायच्या आहेत.

हा प्रकल्प ७९,६५९ चौरस फूट क्षेत्रफळाचा असून तो १२९ कोटी रुपये खर्चून बांधला जाणार आहे. केंद्र सरकारच्या स्मार्ट सिटीज मिशनचा हा एक भाग आहे, ज्याचा उद्देश ठाण्याभोवती गतिशीलता सुधारण्याचा आहे. शहरी विकास मंत्राल याने (MOUD) ठाण्याच्या स्मार्ट सिटी प्रस्तावाला यापूर्वीच मंजुरी दिली आहे.

ठाणे स्टेशन हे व्यस्त व्यावसायिक जिल्ह्याच्या मध्यभागी आहे. अनेक कार्यालये, निवासी आणि मिश्र-वापराच्या इमारती या परिसराच्या आसपास आहेत. ठाणे येथील नवीन व्यावसायिक टॉवर लोकल बस सेवा, उपनगरीय गाड्या आणि आगामी मेट्रोशी जोडलेला असेल. या प्रकल्पामुळे परिसरातील प्रवाशांच्या सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा होण्याची अपेक्षा आहे.

# पर्यावरणाशी सबंधित पितृश्राद्ध आणि कावळे

गणपतीचा मांडव आता मोकळा झाला आहे. दहा दिवस-रात्र गजबजलेला मंडप आणि भाविकांच्या दर्शनाचा आनंद लुटण्यासाठी लागलेल्या लांबच लांब रांगा आत संपल्या आहेत.

साधारणपणे धार्मिक कार्यक्रमांचे व्यवस्थापन हे कुशल लोक हाताळतात. देणगीचे पैसे कुठून येणार आणि कोणाकडे पाठवायचे हे या हुशार लोकांना चांगलेच समजते. मात्र, धार्मिक दिवशी असे पाहायला मिळत नाहीत.

श्राद्ध हा मूक सण आहे. श्राद्धेच्या दिवशी इतर दिवसांप्रमाणे गर्दी किंवा धडपड नसते. हजारो- लाखो लोक अनेक ठिकाणी दर्शनासाठी रांगा लावून जातात, परंतु श्राद्ध पक्षात केवळ पाच ते दहा टक्के लोकच विधी करताना दिसून येतात, प्रत्येक सणा मागे तर्क आणि शास्त्र असते; असं असलं तरी सणांची शास्त्रीय समज नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यात ज्येष्ठ मंडळी अपयशी ठरली आहेच हे मान्य करावच लागेल, पितृश्राद्ध किंवा पितरांची पूजा केल्याने त्यांचा आत्मा तृप्त होतो; अशा चर्चा पासून नवीन पिढीला दूर ठेवते गेले आहे. श्राद्धात भोजनाची जाणीव आहे. घरातील सर्व सदस्य एकत्र बसून पूर्वजांच्या आठवणीत जेवण करतात आणि जुन्या गोष्टी आठवतात,तेव्हा एकत्र जमलेल्या नव्या पिढीला आपले पूर्वज कसे होते याची जाणीव होते.

दुर्दैवाची गोष्ट म्हणजे धार्मिक पक्षांची नावे फक्त लोकांना घाबरवण्यासाठी ठेवली जातात. खरंच, श्राद्धामुळे पूर्वजांचा इतिहास आणि संघर्ष कथा जाणून घेण्याची संधी मिळते. घरातील सदस्यांना पूर्वजांची माहिती देण्याऐवजी ते फक्त फोटोमध्ये दाखवले जातात. आपल्या पूर्वजांनी श्राद्धाच्या दिवशी अन्न खाण्यासाठी कावळे बनून जेवायला येणे, अशा गोष्टी नव्या आणि अगदी ज्येष्ठ पिढीलाही हास्यास्पद वाटणे स्वाभाविक आहे. कां कुणास ठाऊक, पण आपल्या पूर्वजांनी श्राद्धाच्या खऱ्या महत्त्वापासून लोकांना दूर ठेवले. म्हणूनच श्राद्धाच्या दिवशी काही शुभ कर्मे वगळण्यातआली आहेत. लोक श्राद्धाच्या दिवशी दूधपाक किंवा बासुंदी खातात; पण सत्कर्म करू शकत नाहीत हे कसे? श्राद्धाच्या नावाखाली केवळ कर्मकांड आणि कर्मकांडांना महत्त्व दिले गेले, एक प्रकारची भीती निर्माण झाली आणि आपले लोक मूकपणे परंपरा पाळत आहेत.आता वेळ उलटली आहे. नवीन पिढी अनेक कर्मकांड आणि श्राद्धांवर प्रश्न करते.

त्यांना उत्तर देण्याऐवजी गप्प बसवले जाते ते वेगळे. तार्किक उत्तरांअभावी नवी पिढी धार्मिक कार्यांपासून दूर पळत आहे.

श्राद्ध पक्षांशी संबंधित कावळयांचे शास्त्र समजून घेण्यासारखे आहे. वृक्षारोपण आणिग्लोबल वॉर्मिंगबद्दल बोलणीयांनीही श्राद्धापोटी पर्यावरणाबाबत जनजागृती करण्याची गरज आहे. पिंपळ किंवा वडाच्या बिया आज सहज उपलब्ध नाहीत. त्यापैकी अनेक झाडे लावली तरी ती वाढणार नाहीत, कारण या दोन लोकोपयोगी झाडांच्या लागवडीसाठी निसर्गाने वेगळी व्यवस्था केली आहे. या दोन्ही झाडांच्या बिया कावळे खातात. या झाडांच्या बिया कावळयाच्या पोटात गेल्यावर एका विशिष्ट प्रक्रियेतून जातात. त्यानंतर हे कावळे जिथे जातील तिथे त्यांच्या विष्ठेतून बिया बाहेर पडतात आणि त्या जिथे पडतात तिथे हे झाड वाढण्याची शक्यता असते. काही घरांच्या भेगांमध्ये पाइपचे छोटे रोप उगवलेले पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटते.

पिंपळ चोवीस तास ऑक्सिजन देतो, तर वडाच्या झाडात औषधी गुणधर्म असतात. ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये कावळे अंडी घालतात. पिल्ले बाहेर पडल्यानंतर त्यांना खाणे मिळावे, यासाठी घराच्या गच्चीवर काक-ग्रास ठेवला जातो,जेणेकरून ते जवळच्या घराच्या गच्चीवर बसून तो खाऊ शकतील. त्यामुळे पर्यावरणासाठी आवश्यक असलेल्या कावळयांची संख्या वाढण्यास मदत होते. हिंदू संस्कृतीतील सर्व धार्मिक परंपरा अतिशय काळजीपूर्वक तयार केल्या जातात. म्हणूनच म्हटलं जातं की श्राद्धावर विश्वा असो वा नसो, पण काक-ग्रास ठेवला गेलाच पाहिजे.

आत्ता तसही काळवेळ बदलला आहे, नविनपिढी अनेक कर्मकांड आणी श्रद्धावर प्रश्न उपस्थित करते त्यांना वास्तवाच खर महत्व सांगण्या ऐवजी गप्प बसवले जाते म्हणूनच नविन पिढी या धार्मिक कार्यापासून दुर जाऊ लागली आहे, आपल्या पुर्वजांची दिव्यदृष्टी पाहता मानव जातीस व पर्यावरणाची किती आवश्यकता आहे हे ओळखूनच त्यांनी सण उत्सव असोत की श्राद्ध या मागे अज्ञान नवहे तर विज्ञानाची कास धरल्याचे दिसून येते व नविनपिढी मात्र त्यांच्या उलट अनुकरण करीत असल्याने हा छोटास लेख प्रंपच होय,,,




हभप सौ.उर्मिला लाटे
(९२८४५२५१२३)

# आयडीबीआय बँकेचे खाजगीकरण न करता एलआयसीला चालवण्यात द्यावी किंवा जनतेला शेअर उपलब्ध करून द्यावेत

## – प्रशांत बोरकर यांची मागणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) –**

मुंबई : आयडीबीआय बँकेचे खाजगीकरण न करता आयडीबीआय ची जबाबदारी एल आयसी ला द्यावी किंवा त्याचे शेअर विक्री करून जनतेला उपलब्ध करून द्यावे जनता ही शेअर घेण्यास तयार असल्याची माहिती राष्ट्रीय जनता दलाचे प्रदेश प्रवक्ते महाराष्ट्र महासचिव श्री प्रशांत बोरकर यांनी म्हटले आहे सध्या मोठ्या प्रमाणावर केंद्र सरकार खाजगीकरणाकडे वाट लावत असून त्यामुळे सर्वसामान्य जनतेला समस्यांना सामोरे जावे लागणार आहे समाजवादी धोरणानुसार जनतेच्या आर्थिक सुविधा प्रश्न सोडवण्यासाठी सर्व सामान्य जनतेसाठी बँकेचे राष्ट्रीयीकरण समाजवादी धोरणानुसार केले होते तसेच सध्या काही वर्षांपूर्वी मोदी सरकारने जनधन खाते उघडून मोठ्या प्रमाणावर आम्ही बँक खाते उघडले आणि जनतेला फायदा करून दिला अशाप्रमाणे मोठ्या प्रमाणावर गवगवा करण्यात आला परंतु अशा शासकीय सरकारी बँकेत जनधन खाते उघडत आहे खाजगीकरणामधील कोणत्याही बँक या जनधन व शासकीय योजना राबवत नाहीत त्यामुळे सर्वसामान्य जनतेची मोठ्या प्रमाणावर कुटुंबना व लुबाडणूक होणार आहे सध्या अनेक छोट्या बँका या महिला आणि बचत गटाच्या माध्यमातून कर्ज वाटप करून मोठ्या प्रमाणावर आर्थिक शोषण करीत असल्याचे दिसून येत आहे खाजगीकरणातील अनेक बँका या बचत खात्यासाठी दहा हजार रुपये घेतात तसेच बॅलन्स कमी झाल्यास दर दिवसाला महिन्या ला पाचशे रुपयांचा दंड आकारतात त्यामुळे सर्वसामान्य जनतेला ह्या खाजगीकरण करणे परवडणार नाही म्हणून आयडीबीआय बँकेचे खाजगीकरण तातडीने थांबवण्यात यावे सदू बँक ही एलआयसीला ताब्यात द्यावी किंवा जनतेला सदृढ शेअर्स उपलब्ध करून देण्यासाठी शेअर्स विक्री करावी अशी मागणी भारतीय किसान संघटनेचे प्रदेशाध्यक्ष आर्थिक क्षेत्रात ग्राहक चळवळीत विमा क्षेत्रात कार्यरत असणारे जेष्ठ सल्लागार श्री प्रशांत बोरकर यांनी केली आहे

# केडीएमसी परिक्षेत्रात विविध ठिकाणी होणार 'आकांक्षी' शौचालयांची निर्मिती

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) –**

कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ इंदू राणी जाखड यांच्या संकल्पनेतून, नागरिकांच्या विशेषतः महिलांच्या सोयीसुविधासाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिक्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी आकांक्षी शौचालये निर्मितीचे पाऊल महापालिकेने उचलले आहे. या अंतर्गत, स्वच्छ आणि सुसज्ज शौचालये उभारण्यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

वाढत्या नागरीकरणामुळे शौचालयांची गरज देखील वाढली आहे . त्यामुळे सन २००९ मध्ये निर्मल एमएमआर अंतर्गत एमएमआरडीएच्या माध्यमातून निधी मिळाल्याने बांधण्यात आलेल्या जुन्या शौचालयांना आधुनिक आणि उपयुक्त बनवण्याच्या दृष्टिकोनातून या प्रक्रियेची सुरुवात झाली झाली आणि कालांतराने सार्वजनिक शौचालयांची मागणी वाढल्यामुळे, अधिक प्रगत सुविधा पुरवणारी शौचालये आवश्यक ठरली. याचाच एक भाग म्हणून, स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत कडोंमपाने विविध १२ ठिकाणी आकांक्षी शौचालयांची निर्मिती करण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेत एकूण ७२ शौचालय युनिट्स आणि ३६ मुतारी युनिट्स बांधण्यात येणार आहेत. यासाठी शासनाची मंजुरी आधीच मिळाली आहे, आणि काही ठिकाणी काम प्रगतीपथावर आहे.

उदा. राणी लक्ष्मीबाई उद्यानासमोरील आणि आधारवाडी अग्निशमन केंद्रासमोरील शौचालयांची बांधणी प्रक्रिया चालू आहे. याशिवाय, कल्याण पश्चिम येथील मुंबई विद्यापीठाजवळ ज्येष्ठ नागरिक आणि इतर नागरिकांच्या मागणीनुसार प्रिफॅब्रिकेटेड स्वरूपाचे सुसज्ज शौचालय लवकरच सुरू होणार आहे. डोंबिवलीतील गणेश घाट कुंभारखानपाडा, ९० फिट रोड ,टंडन रोड जवळील पुसाळकर उद्यान, मोठागाव ठाकुर्ली गणेश घाट येथे देखील या शौचालयांची उभारणी होणार आहे. आकांक्षी शौचालये प्रकल्पात महिला वर्गासाठी विशेष सुविधा पुरवली जाणार आहेत, कारण भारतासारख्या देशात अजूनही महिलांना 'राईट टू पी' साठी संघर्ष करावा लागतो. या शौचालयांमध्ये महिलांसाठी स्वतंत्र आणि सुरक्षित सुविधा असतील.

महानगरपालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांनी या प्रकल्पावर भर देत नुकतीच संबंधित विभाग, अभियंते, पीएमसी आणि प्रभाग क्षेत्रांच्या सहा आयुक्तांसमवेत सोबत बैठक घेऊन कामाचा आढावा घेऊन त्यांना विहित मुदतीत काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. ज्यामुळे नागरिकांना लवकरच या शौचालयांचा लाभ मिळू शकेल.

या आकांक्षी शौचालय प्रकल्पात महिला वर्गाच्या गरजा ओळखून निर्णय घेतले जात आहेत. उदा; कल्याण स्टेशन परिसरातील कपोते मल्टीलेवल पार्किंगच्या परिसरात महिलांसाठी सुसज्ज शौचालय बांधण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय महिला वर्गाच्या सुरक्षितता आणि स्वच्छतेच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा आहे. कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त यांनी महिलांसाठी स्वच्छ शौचालये आणि मुलभूत सुविधा पुरवण्याबाबत जागरूक भूमिका घेतल्याचे दिसून येते.

आकांक्षी शौचालयांची निर्मिती ही केवळ शहराच्या स्वच्छतेसाठी नाही, तर नागरी सुविधांमध्ये सुधारणा आणि नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने एक मोठे पाऊल आहे. वाढत्या नागरीकरणामुळे ज्या ठिकाणी शौचालयांची आवश्यकता अधिक तीव्र झाली आहे, तेथे या शौचालयांची बांधणी लवकरच पूर्ण होईल. या प्रकल्पात विशेषतः महिलांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांच्यासाठी सुसज्ज शौचालयांची निर्मिती होईल, त्याचप्रमाणे काही शौचालयांमध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी देखील स्वतंत्र सुविधा करण्यात येत आहेत. कल्याण-डोंबिवली महानगर पालिका हे या प्रकल्पाद्वारे सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छतेच्या दिशेने एक आदर्श उदाहरण बनवू पाहत आहे. स्वच्छ शौचालयांचा अभाव असलेल्या ठिकाणी आकांक्षी शौचालयांची निर्मिती ही नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने सकारात्मक बदल घडवेल.

# जागतिक रेबीज दिनानिमित्त अँटी रेबीज लसीकरण शिबीर आयोजन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/(प्रतिनिधी) –**

पशुसंवर्धन विभाग अंतर्गत जागतिक रेबीज दिनानिमित्त अँटी रेबीज लसीकरण शिबीर आयोजित करण्यात आले आहे. ठाणे जिल्ह्यातील सर्व पशुपालकांनी जागतिक रेबीज दिनानिमित्त पशुवैद्यकीय दवाखान्यात दि. २८ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ९ ते दुपारी १:३० वाजेपर्यंत लसीकरण करून घ्यावे असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे. प्रादेशिक सह आयुक्त पशुसंवर्धन मुंबई विभाग डॉ. प्रशांत कांबळे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. वल्लभ जोशी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. समीर तोडणकर यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे जिल्ह्यातील ६९ पशुवैद्यकीय दवाखान्यात शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

अँटी रेबीज लसीकरण शिबीर अंतर्गत ठाणे जिल्ह्यात एकूण ३ हजार ८०० एवढा लस साठा पशुवैद्यकीय दवाखान्यात उपलब्ध करण्यात आला आहे.

दैनिक जीवनदीप वार्ता

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन– जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/– रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.

:: कार्यालय ::

९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१

– E Mail –

jeevandeepvartanews2020@gmail.com news.thanejeevandeep@gmail.com

## राजकीय उद्घाटनाची वाट...

पान १ वरून >> दोन्ही बाजूकडील रस्त्याचा भराव जुलैच्या मुसळधार पावसामध्ये खचला होता. उद्घाटनापूर्वीच या पुलावरून वाहतूक सुरू झाल्याने मोठी दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळे ठेकेदाराने पुलाच्या दोन्ही बाजूकडील रस्त्यावर खडी आणि कच्चामाल टाकून पुलावरील वाहतूक बंद केली होती. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार केल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने पुलाचे काम करणाऱ्या ठेकेदाराला या कामाबाबत असलेल्या त्रुटी सुधारण्यासाठी १२ जुलै रोजी नोटीस दिली होती. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या नोटिसीला ठेकेदाराने केराची टोपली दाखवली आहे. या पुलाच्या कामांमध्ये असलेल्या त्रुटी सुधारण्यासाठी अद्याप कोणतेही काम करण्यात आलेले नाही. पुलाच्या दोन्ही बाजूकडील रस्त्यावर खडी आणि कच्चामाल टाकून पूल बंद करण्यात आला होता. तीच खडी आता पुन्हा बाजूला सारून या पुलावरून पुन्हा वाहतूक सुरू झाली आहे. सध्या या पुलावरून दुचाकी चार चाकी वाहनांची वाहतूक सुरू झाली. दोन्ही बाजू कडील रस्ता खचलेला असताना आणि कोणतीही सुधारणा केलेली नाही. असे असताना वाहतूक ही जीवघेणे ठरू शकते तरी देखील ठेकेदाराचे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होते आहे. खचलेल्या रस्त्यामुळे कोणताही अपघात होऊन दुर्घटना होऊ नये यासाठी ठेकेदाराला पाठीशी न घालता सार्वजनिक बांधकाम विभागाने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे अन्यथा अपघात होण्याची शक्यता आहे, असं आवाहन नागरिकांकडून करण्यात आलं आहे. मात्र राजकारणी मंडळी यांना या पुलाचे उद्घाटन सोहळा करायचा आहे. त्यामुळे पुलावरील वाहतूक बंद ठेवण्यात आली होती.

## क.डों.म.पा वर्धापन दिनानिमित्त...

पान १ वरून >> महापालिकेच्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी होणाऱ्या विविध सामाजिक संस्था यांचा देखील सत्कार करण्यात येणार आहे. ३ ऑक्टोबर रोजी सकाळी १० पासून महापालिका वर्धापन दिनानिमित्त प्र.के.आचार्य अत्रे रंगमंदिरात सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. ४ व ५ ऑक्टोबर रोजी सकाळी १० पासून प्र.के.आचार्य अत्रे रंगमंदिरात ज्येष्ठ नागरीकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार असून, यामध्ये ज्येष्ठांसाठी मनकिर्तन, ज्येष्ठांसाठी आणि ज्येष्ठांनी सादर केलेले सांस्कृतिक कार्यक्रम, ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान इत्यादी कार्यक्रमांचा अंतर्भाव असून, ज्येष्ठ नागरीकांना तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शनही लाभणार आहे.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी